# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### शेतकऱ्यांच्या विधवा महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळणेबाबत

**(१) ५४९ (१८-०३-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा महिलांसाठी शासनाने महिला आयोगाच्या शिफारशी स्वीकारुन या महिलांना विविध योजनांचा लाभ देण्याबाबत आदेश काढला असल्याचे दिनांक २८ जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२७-०१-२०२१)** : (१) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना विविध योजनांचा लाभ देण्याबाबतचा शासन निर्णय, दिनांक १८ जून, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

वि.प. ५ (२)

(२) राज्यातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या सुमारे ७१०३ विधवांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाविद्यालयात प्राचार्य पदी जाण्याच्या अटी व शर्ती बंधनकारक केल्याबाबत

**(२) १२६० (१८-०३-२०२०). श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक ३० जून, २०१० पूर्वी कायमस्वरूपी विद्यापीठ मान्य प्राचार्यांना एका महाविद्यालयातून दुसऱ्या महाविद्यालयात प्राचार्य पदी जावयाचे असल्यास त्यांना अटी व शर्ती बंधनकारक आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ०४ एप्रिल, २००० रोजीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेत त्यांना अटी शर्ती लागू नाहीत असे स्पष्ट निर्देश असताना सुध्दा त्याची अंमलबजावणी शासनाकडून होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०५-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही केली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नवीन ग्रंथालयांची मान्यता प्रलंबित असल्याबाबत

**(३) १२६५ (१८-०३-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश नवीन ग्रंथालयांची मान्यता मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असून ग्रंथालयातील श्रेणीत बदल केले जात नसल्यामुळे अनेक ग्रंथालये अडचणीत आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या कार्यरत असलेल्या ग्रंथालयांना मागील आठ वर्षांपासून श्रेणीवाढ ६० टक्के अनुदान न मिळाल्यामुळे ग्रंथालयांची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले असून मागील आठ वर्षात एकही नव्या ग्रंथालयास श्रेणीबदल, नव्याने मान्यता तसेच अनुदान न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील ग्रंथालयांची श्रेणीबदल, नव्याने मान्यता, अनुदानाची वाढ तसेच ग्रंथालयांची झालेली दुरवस्था याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०३-०२-२०२१) :** (१) व (२) मा.मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक २२/०३/२०१३ निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत नवीन ग्रंथालयांना मान्यता व कार्यरत ग्रंथालयांना दर्जावाढ देण्यात येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## भुकंपग्रस्त भागातील तरुणांना समांतर आरक्षणांतर्गत शासकीय नोकरी देण्याबाबत

**(४) १६५९ (१८-०३-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भुकंपग्रस्त भागातील तरुणांना शासकीय नोकऱ्यांमध्ये २ टक्के समांतर आरक्षण लागू केले असले तरी प्रत्यक्षात २ हजार ७७५ तरुणांना नोकऱ्या देण्यात आल्या असून आतापर्यंत २२ हजार उच्चशिक्षित तरुण शासकीय नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समांतर आरक्षणाची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समांतर आरक्षणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन भुकंपग्रस्त भागातील नोकरीचा अनुशेष भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (२७-०१-२०२१) :** (१) नाही.

(२), (३) व (४) सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. १००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑगस्ट, २००९ व महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्र. आव्यप्र-२००९/प्र.क्र.६२/०९/आव्यप्र-२, दिनांक १८ डिसेंबर, २०१५ नुसार भुकंपग्रस्तांसाठी लागू केलेल्या २% समांतर आरक्षणाची तसेच इतर समांतर आरक्षण घटकांची राज्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागामार्फत वेळोवेळी आवश्यक त्या सूचना देण्यात येत आहेत.

(शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १११८/प्र.क्र.३३२/१६-अ, दिनांक ६ सप्टेंबर, २०१८) त्यामुळे विलंब झालेला नाही.

---

## गडचिरोली गोंडवाना विद्यापीठांतर्गत जमिनीचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५) ३१७१ (०२-०६-२०२०). श्री.रामदास आंबटकर : तारांकित प्रश्न क्रमांक १०० ला दिनांक ६ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली गोंडवाना विद्यापीठांतर्गत जमीन अधिग्रहित करताना गैरप्रकार झाल्याचे सिनेट सदस्यांनी व्यवस्थापन समितीच्या अधिसभेत प्रश्न उपस्थित करून सदर प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्याची मागणी केल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसंपादन प्रक्रियेतील मुल्यांकन संदर्भात लोकप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली जमीन गैरप्रकाराची चौकशी करण्यासंबंधी नेमण्यात आलेल्या समितीने दिनांक ३ मे, २०१९ रोजी सादर केलेल्या अहवालात ९ शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी किंमतीत तफावत असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू जमीन गैरप्रकारातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०८-०२-२०२१) :** (१) खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) तत्कालीन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, गडचिरोली, सहायक अभियंता श्रेणी-१, सा.बा.विभाग क्र.१, गडचिरोली व सहा.अभियंता श्रेणी-२, सा.बा.विभाग क्र.१, गडचिरोली यांचेवर दोषारोप ठेवून त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कळविण्यात आले आहे. तसेच सदर प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याकरीता गृह विभागास सुध्दा कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(६) ३३१७ (२८-०५-२०२०). श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी श्री.अशोक कडूस यांनी भ्रष्टाचार करून अनेक अनियमित कामे केली असून शिक्षण सेवकांचा अपव्यवहार केल्याने सदर भरती प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश शिक्षण संचालकांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.अशोक कडूस, शिक्षणाधिकारी यांच्याकडून शिक्षकांची वरिष्ठ वेतनश्रेणी, निवडश्रेणी, वैद्यकीय देयके आदींचे प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आले असून दळणवळण बंदीचे आदेश असताना देखील श्री.अशोक कडूस यांच्याकडून सदरहू आदेशांचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षणाधिकारी, श्री.अशोक कडूस यांचे निलंबन करून त्यांची विभागीय चौकशी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (०८-०२-२०२१) :** (१) व (२) याबाबत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे यांना दिलेले आहेत.

(३) प्रस्तुत प्रकरणाचा परिपूर्ण अहवाल आयुक्त (शिक्षण), पुणे कार्यालयाकडून प्राप्तीअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ इमारत बांधकामाचा निधी इतरत्र खर्च केल्याबाबत

**(७) ३४३५ (०२-०६-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या नवीन इमारत बांधकामास व अपूर्ण इमारत पूर्ण करण्यासाठी माहे मार्च, २०२० अखेर रुपये १४ कोटी ५० लाख इतका निधी तसेच यापूर्वी रुपये ४ कोटी ६ लाख निधी उपलब्ध करुन दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतीच्या बांधकामासाठी उपलब्ध करुन दिलेला निधी विद्यापीठाने नियोजित कामासाठी खर्च न करता इतरत्र खर्च केला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०१-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांना लेखाशीर्ष २४१५ ००९९ अंतर्गत ३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान अंतर्गत विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्राच्या जलद विकासासाठी राबवावयाच्या योजना-२०१८ अंतर्गत विद्यापीठातील अपुर्णावस्थेतील इमारतीची बांधकामे पूर्ण करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी रुपये १४ कोटी ५० लाख इतक्या निधी वितरणाबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तथापि, आर्थिक वर्ष संपल्यामुळे सदरचा निधी व्यपगत झाल्यामुळे प्रत्यक्षात बिम्स प्रणालीवर वितरित झालेला नाही. तसेच यापुर्वी लेखाशीर्ष २४१५ ००९९ अंतर्गत ३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान अंतर्गत रुपये ३.०० कोटी निधी प्रत्यक्ष बिम्स प्रणालीवर वितरित झालेला आहे.

(२) खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र वाशिम येथे होण्याबाबत

**(८) ३५३७ (०२-०६-२०२०). डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ११४४ ला दिनांक ६ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठ परिक्षेत्रात विद्यापीठाचे उपकेंद्र निर्मितीकरीता धोरण निश्चित करण्यासाठी डॉ.योगानंद काळे, माजी प्रकुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली शासनाव्दारे गठित करण्यात आलेल्या समितीने कोणता निर्णय घेतला आहे, तसेच समितीने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(२) असल्यास, सदर समितीने उपकेंद्र स्थापन करण्यासाठी निश्चित केलेल्या निकषानुसार प्रस्तावाची करण्यात आलेली तपासणी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र वाशिम येथे होण्याबाबतच्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०९-०२-२०२१) :** (१) योगानंद काळे समितीने खालीलप्रमाणे शिफारसी केलेल्या आहेत :-

१) विद्यापीठाच्या उपपरिसराचे १५ ते २० वर्ष कालावधीत स्वतंत्र विद्यापीठात रुपांतर होण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने आराखडा तयार करावा.

२) प्रत्येक उपपरिसर निर्माण करण्यासाठी सर्वसाधारणपणे किमान १०० संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था आणि किमान ५०००० विद्यार्थी संख्येसाठी एक तसेच किमान ५० एकर जागा असावी.

३) प्रत्येक उपपरिसरासाठी पहिल्या ३ वर्षाच्या कालावधीत रुपये २५ कोटी निधी देण्याबाबतची आर्थिक तरतूद विद्यापीठांनी करावी.

४) सुरुवातीला ५० कोटी रुपयाचा Corpus Fund निर्माण करण्यात यावा. विद्यापीठ व राज्य शासनाने ३ वर्षाच्या कालावधीत अर्धे-अर्धे पैसे जमा करावेत.

(२) व (३) उपकेंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावाची वित्त विभागाकडून तपासणी करण्यात येत असून, वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची पुर्तता झाल्यानंतर उपकेंद्र स्थापन करणेबाबत धोरण निश्चित करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वीज गळतीच्या नावाखाली गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(९) ४०६२ (१७-०७-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास कदम, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वीज गळतीच्या नावाखाली वीज कंपनीचे अधिकारी व कर्मचारी संगनमताने दहा हजार पाचशे कोटी रुपयांचा दरवर्षी गैरव्यवहार करीत असल्याचे माहे मार्च, २०२० च्या पहिल्या आठवड्यात सावंतवाडी तालुका (जि.सिंधुदुर्ग) व्यापारी उद्योजक व व्यावसायिक संघाने वीज दरवाढीच्या संकटावर आयोजित केलेल्या चर्चासत्रात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात १३ कोटी लोकसंख्या आहे आणि २ कोटी ग्राहक आहेत, तसेच राज्यात वीज वितरणाची गळती किमान १२ टक्के अपेक्षित असताना ३० टक्के आहे त्यामुळे सदरहू कोट्यवधी रुपयाचा गैरव्यवहार दरवर्षी संगनमताने होत असल्यामुळे ग्राहकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीज गळतीच्या नावाखाली दरवर्षी होणारा कोट्यवधीच्या गैरव्यवहारामुळे अन्य राज्यात स्वस्त वीज आहे, ती महाराष्ट्रात महागडी वीज ग्राहकांना दिली जात असून ग्राहकांना नविन जोडणी घेताना वीज मीटर व पोलचे पैसे घेण्यास मनाई असताना बेकायदेशीररित्या ग्राहकांकडून रक्कम वसुल केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वीज गळतीच्या नावाखाली दरवर्षी कोट्यवधी रुपयांच्या होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०४-०२-२०२१) :** (१) व (२) महावितरण कंपनीने आर्थिक वर्ष २०२०-२०२१ ते २०२४-२०२५ या कालावधीकरीता वीजदर याचिका महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास दिनांक २६/११/२०१९ रोजी सादर केली. सदर याचिकेमध्ये महावितरणने सन २०२०-२०२१ ते सन २०२४-२०२५ या कालावधीकरीता दरवर्षी सुमारे १६००० ते १७००० द.ल.यु. इतकी वितरण हानी अपेक्षित धरली आहे. सदर याचिकेत महावितरण कंपनीने सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता १६२६२ द.ल.यु. इतकी वितरणहानी १३.०१% प्रमाणे आयोगाकडे सादर केली. प्रत्यक्षात सन २०१९-२०२० करीता महावितरणची वितरण हानी १५.९१% इतकी आहे. महावितरणव्दारे वीज खरेदी करतांना वीज विक्रीकरीता आवश्यक युनिट्स व वितरण हानी गृहीत धरलेले युनिट्स अशी एकूण वीज खरेदी करण्यात येते व त्याकरीता लागणारा खर्च वार्षिक महसुलाच्या गरजेमध्ये दाखविला जातो.
(३) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाव्दारे राज्यातील वितरण कंपन्यांचे वीजदर निश्चित केले जातात. सदरचे वीज दर वितरण कंपनीच्या एकूण महसुलाच्या गरजेनुसार निश्चित केले जातात. परंतु ०-१०० युनिटपर्यंतचे घरगुती ग्राहक, कृषीपंप ग्राहक, सार्वजनिक पाणीपुरवठा ग्राहक यांचे वीजदर महावितरण कंपनीच्या सरासरी वीज पुरवठा आकारापेक्षा कमी ठरविले आहेत व या दराच्या फरकाची रक्कम क्रॉस सबसिडीच्या माध्यमातून उच्चदाब औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांच्या वीज दरात समाविष्ट केले जातात. त्यामुळे उच्च दाब औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांचे वीज दर सरासरी वीज पुरवठा आकारापेक्षा जास्त असतात. महावितरण कंपनीकडून ग्राहकांना नवीन वीज जोडणी देताना वीज मीटरची किंमत घेण्यात येत नाही. तसेच ग्राहकधिष्ठित वितरण सुविधा (Dedicated Distribution Facility) व्यतिरिक्त ग्राहकांकडून पायाभूत सुविधांच्या उभारणीचा खर्च वसुल केला जात नाही.

(४) वीज गळती ही तांत्रिक व वाणिज्यिक कारणामुळे होत असते. ती कमी करण्याकरीता महावितरण कंपनीकडून वीज चोऱ्या पकडणे, मीटर वाचनाकरीता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करणे इ. उपाययोजना राबविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिडको कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी स्थापन केलेल्या स्नेहपुष्प गृहनिर्माण संस्थेबाबत

**(१०) ४२९१ (१७-०७-२०२०). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडको कर्मचारी कल्याणकारी गृहनिर्माण योजनेंतर्गत सिडकोतील ३२ कर्मचाऱ्यांनी निवासासाठी स्नेहपुष्प गृहनिर्माण संस्था स्थापन करुन भूखंडाची मागणी केल्याप्रमाणे भाडेपट्टयावर भूखंड देण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूखंड सिडकोमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने विकासकाने बळकाविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित विकासक व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-०२-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सिडकोच्या ३२ कर्मचाऱ्यांकरीता नेरुळ येथील सेक्टर-४० मधील भूखंड क्र.९ व १० हा मे.स्नेहपुष्प को.ऑ.हौ.सोसायटीला दिनांक २०/०५/१९९४ रोजी इरादापत्र देण्यात आला आहे. सदर संस्थेने रुपये ७३.७९ लाख रुपयांचा भरणा केल्यानंतर उक्त भूखंडांचा दिनांक १८/०२/२००२ रोजी भाडेपट्टा करारनामा करण्यात आला आहे.

तथापि, तत्कालीन वसाहत विभागातील कर्मचारी/अधिकाऱ्यांनी सिडको कर्मचारी नसलेल्या बाह्य त्रयस्थ व्यक्ती श्री.हरिश नागजी छेडा यांना सोसायटीचे अतिरिक्त सभासद केले. तद्नंतर सदर भूखंड विकासक मे.शहा ॲण्ड छेडा होम्स प्रा.लि. यांना हस्तांतरित करण्यात आला. उक्त भूखंड हे निव्वळ निवासी प्रयोजनाकरीता वाटप केलेला असताना सदर भूखंडावरील चटईक्षेत्र वाढवून सदर भूखंडांचा निवासी ऐवजी निवासी व वाणिज्य असा वापर मंजूर करण्यात आला आहे.

(३) सिडकोच्या दक्षता विभागाने चौकशीअंती दोषी सिडको कर्मचारी आणि विकासाविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची शिफारस केल्यानंतर सी.बी.डी. बेलापुर पोलीस स्टेशन येथे सी.आर.क्र.५० अन्वये फौजदारी गुन्हा दिनांक ११/०३/२०२० रोजी दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यात सन २०१८ च्या खरीप हंगामाकरीता चारा छावण्याबाबत

**(११) ४४९८ (१४-०९-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१८ च्या खरीप हंगामात दुष्काळी परिस्थितीमुळे सुरू करण्यात आलेल्या चारा छावणीसाठी दिनांक ७ मे, २०१९ रोजी व दिनांक ७ जून व १४ जून, १६ डिसेंबर, २०१९ रोजी काढलेल्या निधी वितरण आदेशान्वये चारा छावणी सर्वांसाठी माहे ऑगस्ट, २०१९ अखेरपर्यंतचे अनुदान लेखाशीर्ष २२४५ ००७५ मध्ये रुपये ४५,१०,३७,०३८/- व लेखाशीर्ष २२४५ २१४९ मध्ये रुपये १७,२२,६०,६२६ असा एकूण रुपये ६२,३२,९७,६६४/- रक्कम उपलब्ध करून देण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चारा छावणीसाठी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१९ साठी अनुदान खर्च करण्यास परवानगी व अनुदान मिळणेबाबत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी दिनांक ६ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने चारा छावणीसाठी अनुदान खर्च करण्यास परवानगी व अनुदान मिळणेबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२७-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) चारा छावण्यांसाठी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१९ साठीचे अनुदानापोटी लेखाशीर्ष २२४५ ००७५ मध्ये रुपये १०,७२,८५,०००/- व लेखाशीर्ष २२४५ २१४९ मध्ये रुपये ४,५९,७९,००/- असा एकूण रुपये १५,३२,६४,०००/- निधी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना बीड व उस्मानाबाद जिल्ह्यांतील चारा छावण्यांकरीता शासन निर्णय क्रमांक : एससीवाय-०४/२०१९/प्र.क्र.२६/म-११, दिनांक ०९/०७/२०२० अन्वये उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यापैकी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना चारा छावण्यांसाठी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१९ साठीचे अनुदानापोटी लेखाशीर्ष २२४५ ००७५ मध्ये रुपये ३,४७,६९,०००/- व लेखाशीर्ष २२४५ २१४९ मध्ये रुपये १,४९,०१,०००/- असा एकूण ४,९६,७०,०००/- एवढा निधी प्राप्त झालेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे थकित वेतन अदा करण्याबाबत

**(१२) ४७९२ (०८-१२-२०२०). श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वाचन संस्कृती वाढण्याकरीता मागील ५३ वर्षापासून ग्रंथालय चळवळ सुरु असून सद्य:स्थितीला १२,१४४ ग्रंथालयातील हजारो कर्मचाऱ्यांचे वेतन मागील ९ महिन्यांपासून थकित असल्याचे माहे जुलै, २०२० च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्मचाऱ्यांच्या थकित वेतनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आल्याने सदर ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी शासनाकडे थकीत असलेले अनुदान तात्काळ द्यावेत अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०९-०२-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या, दिनांक ०३/०८/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे सन २०१९-२०२० मधील थकीत असलेले सहाय्यक अनुदान वितरित करण्यात आले आहे. तसेच वित्त विभागाकडून प्राप्त सहमतीनुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या, दिनांक २४/११/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सन २०२०-२०२१ मधील पहिल्या हप्त्याचा काही भाग अदा करण्यासाठी निधी वितरित करण्यात आला आहे.
(३) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सन २०२०-२०२१ मधील पहिल्या हप्त्यासाठी आवश्यक असलेला उर्वरीत निधी वितरित करण्यास मान्यता देणेबाबत वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात इंग्रजी माध्यमाच्या निवासी नामांकित शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश न देण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(१३) ४७९३ (०३-१२-२०२०). श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी विभागाने चालु शैक्षणिक वर्षासाठी इंग्रजी माध्यमाच्या निवासी नामांकित शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश न देण्याचा निर्णय घेतल्याची बाब माहे जुलै, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे नागपूर विभागातील हजारो अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नामांकित शाळेतील प्रवेशापासून वंचित रहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विभागाच्या माध्यमातून अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याची योजना सन २०२०-२०२१ मध्ये न राबविल्यामुळे राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना या प्रवेशापासून वंचित रहावे लागत असल्याने सदर निर्णयाचा फेरविचार करुन ही योजना शासन राबविणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चालु शैक्षणिक वर्षासाठी इंग्रजी माध्यमाच्या निवासी नामांकित शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबतच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०८-०२-२०२१) :** (१) कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे "अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे" या योजनेंतर्गत माहे मार्च ते एप्रिल या कालावधीत प्रस्ताव प्राप्त सर्व शाळांची तपासणी क्षेत्रिय अधिकाऱ्यांना वेळेत करता आली नाही. सबब, शासन निर्णय, दिनांक २२/०५/२०२० अन्वये इयत्ता १ ली व २ री तील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये प्रवेश देण्याबाबत स्थगिती देण्यात आली आहे.

(२), (३), (४) व (५) "अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे" या योजनेस सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षासाठी स्थगिती देण्यात आली असली तरी सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षामध्ये या योजनेंतर्गत यापुर्वी निवडलेल्या विद्यार्थ्यांना सर्व नामांकित शाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे शिक्षण पुर्वीप्रमाणे सुरु आहे.

---

## प्राध्यापकांच्या विविध प्रश्नासंदर्भात बैठक झाल्याबाबत

**(१४) ४८८६ (१८-११-२०२०). श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांबाबत मराठवाडा शिक्षक लोकप्रतिनिधी व प्राध्यापक संघटना प्रतिनिधी यांच्यासोबत मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांसह माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतलेल्या बैठकीमध्ये कोणता निर्णय घेण्यात आला,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या पत्राव्दारे पीएच.डी/एम.फिलच्या आगाऊ वेतनवाढी लागू करणे तसेच प्राचार्य पदाची वेतनश्रेणीस्तर १४ मध्ये निश्चित करण्याच्या अनुषंगाने सुधारित आदेश/सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्रालय यांच्याकडून संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते, तसेच त्यानुषंगाने प्राप्त झालेल्या माहितीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राध्यापकांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०५-०२-२०२१) :** (१) दिनांक ०३/०२/२०२० रोजी मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधी शिक्षकीय संघटनांचे प्रतिनिधी यांच्यासमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीमध्ये प्रामुख्याने शिक्षक संवर्गाना पीएच.डी/एम.फील च्या आगाऊ वेतनवाढी तसेच प्राचार्य पदाची वेतननिश्चितीस्तर-१४ मध्ये करण्यासंदर्भात केंद्र शासन व विद्यापीठ अनुदान आयोगाकडून खुलासा/ मार्गदर्शन घेण्याची कार्यवाही करावी असे मा.मंत्री महोदयांनी निर्देश दिले.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) दिनांक ०३/०२/२०२० रोजीच्या बैठकीमध्ये मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०८/०६/२०२० व दिनांक १२/१०/२०२० अन्वये केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून माहिती/मार्गदर्शन मागविले असून ते अद्याप अप्राप्त आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महापालिकेमार्फत टास्क फोर्सच्या शिफारशींची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(१५) ४९७५ (२०-११-२०२०). श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोरोना रूग्णांची संख्या गत काही दिवसात काही प्रमाणात कमी झालेली असताना मात्र मुंबई शहरातील कोरोना बांधिताची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापालिकेच्या अखत्यारीतील कोरोना रूग्णालयासाठी १८,०७१ राखीव खाटापैकी आजमितीस ५५०० हून अधिक खाटा रिकाम्या असून अतिदक्षता विभागातील १९९९ खाटापैकी २५९ रिकाम्या आहेत, मुंबई दररोज २२०० च्या आसपास रूग्ण सापडत असल्यामुळे उपचाराधीन रूग्णांची संख्या २५,६५९ इतकी असताना इतक्या प्रचंड प्रमाणात खाटा रिकाम्या कशा राहतात अशी विचारणा नागरीक तसेच डॉक्टराकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महापालिकेचे कोरोना नियंत्रणासाठीचे धोरणही गोंधळात टाकणारे असून रोज किमान २५,००० चाचण्या होण्याची आवश्यकता असताना महापालिकेमार्फत चाचण्याचे प्रमाण वाढविले जात नसल्याची खंत टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ.संजय ओक व अन्य सदस्य डॉ.शशांक जोशी यांनी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर टास्क फोर्सच्या शिफारशींची अंमलबजावणी महापालिकेमार्फत न होण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबईतील कोरोना बांधिताची संख्या तसेच मृत्यू परिणामकारकरित्या रोखण्याकरीता कोणत्या उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.प. ५ (१८)

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) दिनांक ०२/१२/२०२० रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रुग्ण दुप्पट वाढीचा कालावधी २२२ दिवस इतका झाला असून, रुग्ण वाढीचा दर मंदावला आहे.

लक्षण विरहित रुग्णांना घरी अलगीकरण सुविधा उपलब्ध असून, सक्रीय रुग्णांपैकी केवळ लक्षणे असलेल्या रुग्णांनाच रुग्णालयात दाखल केले जाते. सदर रुग्णांची संख्या कमी असल्यामुळे रुग्णालयात खाटा रिकाम्या आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालयात ८३, सायन रुग्णालयात २००, नायर रुग्णालयात २९१, कूपर रुग्णालयात २८८ व उपनगरीय रुग्णालयांमध्ये ६४३ खाटा कोविडबाधित रुग्णांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

(३) मुंबईत जास्तीत जास्त कोरोनाचे रुग्ण शोधून काढण्याचे धोरण असून, आय.सी.एम.आर. च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे सर्व लक्षणे असलेल्या व्यक्तींच्या चाचण्या केल्या जातात व रुग्ण निदान झाल्यावर त्या रुग्णाच्या संपर्कातील सर्व व्यक्तींच्या व त्याचबरोबर त्या रुग्णाच्या राहण्याच्या ठिकाणी केलेल्या सर्वेक्षणात सापडलेल्या अतिजोखमीच्या व्यक्तींच्या देखील चाचण्या केल्या जातात.

(४) टास्क फोर्सच्या शिफारशीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये व दवाखान्यांमध्ये कोविडच्या चाचण्यांची सुविधा उपलब्ध करण्यात आली असून, खाजगी प्रयोगशाळांना देखील कोरोनाच्या तपासण्या करण्यास समाविष्ट करण्यात आले आहे.

मुंबईत दैनंदिन चाचण्यांचे प्रमाण १६,००० पर्यंत पोहोचले आहे.

मिशन सेव्ह लाईव्हज, मिशन युनिव्हर्सल टेस्टींग, माझे कुटुंब माझी जबाबदारी, चेस दी वायरस यासारख्या उपक्रमांमुळे मुंबईचा रिकव्हरी रेट ९१%, रुग्ण मृत्यू दर १.७९% व रुग्ण दुप्पट वाढीचा कालावधी दिनांक ०२/१२/२०२० रोजी २२ दिवसांवर पोहोचला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंतिम वर्षाच्या ऑनलाईन परिक्षेच्या सर्व्हरवर सायबर हल्ला झाल्याने तांत्रिक अडचण निर्माण झाल्याबाबत

**(१६) ५००९ (१८-११-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठाचे विविध विभाग तसेच दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (आयडॉल) अंतिम वर्षाच्या ऑनलाईन परिक्षेच्या सर्व्हरवर सायबर हल्ला झाल्याने तांत्रिक अडचण निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सायबर हल्ल्यामुळे विद्यार्थ्यांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याने उक्त सायबर हल्ल्याचा परिणाम आयडॉलच्या १० हजार विद्यार्थ्यांना बसला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित हल्ल्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०८-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (आयडॉल) परीक्षा दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० पासून घेण्यात आल्या असून सदर परीक्षेचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठी नियुक्त कंपनीने सर्व्हरवर सायबर हल्ला झाल्याची प्राथमिक माहिती विद्यापीठास कळविली होती. याबाबत मुंबई विद्यापीठाने बीकेसी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेचा निकाल घोषित करण्याबाबत

**(१७) ५१२१ (१२-११-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेचा शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम या अभ्यासक्रमाचा निकाल अद्याप घोषित झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अभ्यासक्रमात अंतर्गत गुणांवर निकाल घोषित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कुलगुरू, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांना दिनांक २४ जून, २०२० रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीनुसार निकाल घोषित करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०८-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम या अभ्यासक्रमाची ऑनलाईन परीक्षा दिनांक ५ ते २० ऑक्टोबर, २०२० यादरम्यान झाली असून सदर परीक्षेचा निकाल दिनांक २८ ऑक्टोबर, २०२० रोजी घोषित करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विद्यापीठाचे विविध विभाग तसेच दूर व मुक्त अध्ययन संस्थामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांच्या पुनर्नियुक्त्या करण्याबाबत

**(१८) ५१८८ (१२-११-२०२०). श्री.रामनिवास सिंह, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठाचे विविध विभाग तसेच दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल) यामध्ये तात्पुरत्या स्वरुपात तसेच कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या शिक्षकांच्या पुनर्नियुक्त्या मागील सहा महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना परिक्षांबाबत मार्गदर्शन आणि समुपदेशनासाठी आयडॉलकडे सद्य:स्थितीत शिक्षक नसल्याचे निदर्शनास आले असून शिक्षकांना मागील चार महिन्यांपासून वेतनही मिळाले नसल्याने उक्त नियुक्त्या तसेच वेतन न होण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित शिक्षकांच्या पुनर्नियुक्त्या करुन त्यांना वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०५-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) ज्या विद्यापीठांमध्ये दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल) सुरू आहे, तेथे आवश्यकतेनुसार शिक्षकीय पदांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून त्यांच्या वेतन नियमानुसार विहित वेळेत अदा केले जात आहे. तसेच विद्यार्थ्यांना परीक्षांबाबत मार्गदर्शन व समुपदेशाचे कामकाज सुरळीतपणे सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत डॉ.राम मनोहर त्रिपाठी हिंदी साहित्य संग्रहालय व हिंदी भाषा भवनाकरीता स्वतंत्र इमारत बांधण्याबाबत

**(१९) ५१९९ (१२-११-२०२०). श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विश्वविद्यालयाच्या कलिना परिसरामध्ये डॉ.राम मनोहर त्रिपाठी हिंदी साहित्य संग्रहालय व हिंदी भाषा भवनाकरीता स्वतंत्र इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असून शासनाने डॉ.राम मनोहर त्रिपाठी हिंदी भाषा भवन करण्याबाबतची घोषणा करून अनेक वर्षाचा कालावधी होवूनही कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भवनाकरीता विश्वविद्यालय परिसरामधील जागा निश्चित करण्यात आली असून जिल्हाधिकारी यांच्याकडून निधी तरतूद होऊन वर्ग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त भवनाच्या संदर्भात लोकप्रतिनिधींनी विधान परिषदेत विविध आयुधांव्दारे शासनाचे लक्ष वेधून पाठपुरावा करुनही विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर हिंदी भवनाच्या बांधकामाची घोषणा होवूनही जागा उपलब्ध तसेच निधी मंजूर असताना सुध्दा हिंदी भवन बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०८-०२-२०२१) :** (१) खरे नाही.

(२) खरे आहे.

(३) व (४) मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरातील उपलब्ध एफएसआयचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी मुंबई विद्यापीठाकरीता नव्याने मास्टर प्लॅन तयार करणे प्रगती पथावर असून, सदर मास्टर प्लॅनमध्ये हिंदी भाषा भवन निर्मितीचा समावेश करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विकास महामंडळाच्यावतीने खरेदी करण्यात आलेले धान खराब झाल्याबाबत

**(२०) ५२४४ (१४-१२-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळाच्यावतीने खरेदी करण्यात आलेले धान उघड्यावर ठेवल्याने पाऊसामुळे भिजून लाखो क्विंटल धान खराब झाल्याचे दिनांक १६ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०९-०२-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत वजन १४.२० लक्ष क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली असून उपप्रादेशिक कार्यालय, अहेरी अंतर्गत वजन ७.९३ लक्ष क्विंटल धानाची खरेदी झाली, अशी एकूण २२.१३ लक्ष क्विंटल धानाची खरेदी केलेली आहे. आदिवासी विकास महामंडळाच्यावतीने खरेदी करण्यात आलेल्या उर्वरित वजन १.९२ लक्ष क्विंटल धान गोदामा अभावी उघड्यावर साठवणूक केलेला असून काही अंशी धान पाऊसामुळे भिजलेले आहे. शिल्लक असलेल्या धानाचे जिल्हाधिकारी यांचे निदेशानुसार पथक नियुक्ती करुन पंचनामा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवीन परिभाषित अंशदान सेवानिवृत्त वेतन योजना रद्द करण्याबाबत

**(२१) ५२७८ (१८-११-२०२०). श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन परिभाषित अंशदान सेवानिवृत्त वेतन योजना (डीसीपीएस/एनपीएस) रद्द करून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन नियम, १९८२ (जुनी पेंशन) पूर्ववत लागू करण्याबाबत दिनांक १० जुलै, २०२० रोजीची घटनाबाह्य अधिसूचना रद्द करण्याबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक १० ऑक्टोबर, २०२० रोजी निवेदन पाठवून अधिसूचना रद्द करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेच्यावतीने दिनांक २ ऑक्टोबर, २०२० रोजी वर्धा ते सेवाग्राम आत्मक्लेश पायी पेंशन दिंडी काढली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या उप सचिवांनी दिनांक ०३ सप्टेंबर, २०२० रोजी अस्तित्वात नसलेल्या विषयाबाबत नियमबाह्य शासन परिपत्रक निर्गमित केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन घटनाबाह्य अधिसूचना रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०८-०२-२०२१) :** (१) याबाबतचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२० चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) दिनांक १० जुलै, २०२० रोजीची अधिसूचना दिनांक ११ डिसेंबर, २०२० अन्वये मागे घेण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## रत्नागिरी गॅस अ‍ॅण्ड पॉवर कंपनी लि. मध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२२) ५३७४ (२३-११-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एनरॉन या अमेरीकी कंपनीचा रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळ वीज प्रकल्प पुनरुज्जीवीत करुन रत्नागिरी गॅस अ‍ॅण्ड पॉवर कंपनी लि. या नव्याने सुरु केलेल्या प्रकल्पाच्या उभारणीच्या काळात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्याची चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने माजी केंद्रीय गृह सचिव श्री.माधव गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने दिनांक १० एप्रिल, २००१ रोजी शासनास सादर केलेल्या अहवालात सदर कंपनीत गैरव्यवहार झाल्याचा निष्कर्ष काढलेला असून चौकशीसाठी रितसर न्यायिक चौकशी आयोग नेमण्याची शिफारस करण्यात आलेली होती व त्यानुसार चौकशीसाठी राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्या.कुर्डूकर चौकशी आयोगाची स्थापना केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले होते व मूळ प्रकल्पाच्या उभारणीच्या काळात गैरव्यवहार झाला होता काय, या चौकशीचा विषय आता बंद करावा, अशी विनंती राज्य शासनामार्फत सर्वोच्च न्यायालयाला करण्यात आली असता सदरची राज्य शासनाची विनंती सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास अमान्य केली व त्यामुळे चौकशी आयोगाचे काम सुरु ठेवणे आवश्यक होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असतानाही न्या.कुर्डूकर आयोगाचे कामकाज चौकशी पूर्ण होण्यापूर्वीच राज्य शासनाने माहे मार्च-एप्रिल, २०१९ च्या दरम्यान बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माजी केंद्रीय गृह सचिव श्री.माधव गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालाचे स्वरुप काय आहे व सदर अहवालानुसार चौकशी पूर्ण होण्याअगोरदच बंद करण्याची कारणे काय आहेत व याबाबत राज्य शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२८-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियनने मा.सर्वोच्च न्यायालयात दाभोळ पॉवर कंपनीसंदर्भात स्पेशल लीव्ह पिटीशन (SLP) क्र. ७७३४/१९९७ दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये दिनांक ११/०४/२०१९ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे न्यायनिर्णय दिलेला आहे :-

"सदर प्रकरणामध्ये Power Project Agreement (PPA) अंमलात येऊन २५ वर्षापेक्षा अधिक काळ झालेला आहे. विदेशी महामंडळ व प्रकल्पाचे मूळ प्रवर्तक आता उपलब्ध नाहीत. बहुतेक सर्व वरिष्ठ अधिकारी निवृत्त झालेले आहेत. त्यांच्यावर कोणतीही कारवाई होऊ शकत नाही. सदर प्रकरणी प्रदीर्घ विलंब पाहता व यामध्ये संबंधित व्यक्ती उपलब्ध नसल्यामुळे चौकशी आयोगाच्या कामकाजाचा कोणताही उपयोग होणार नसल्याने, सदर याचिका खारीज करण्यात येत आहे."

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त न्यायनिर्णयानुसार सदर प्रकरणी पुढील कार्यवाही अपेक्षित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरेगाव-भिमा (ता.शिरुर, जि.पुणे) येथे घडलेल्या हिंसाचाराची चौकशी करण्याबाबत

**(२३) ५३९५ (१३-१२-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी पुणे जिल्ह्यातील भिमा-कोरेगाव येथील विजय स्तंभाला अभिवादन करण्यासाठी आलेल्या जनसमुदयावर काही समाजकंटकांनी हल्ला केल्यानंतर झालेल्या हिंसाचारासंदर्भातील चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०९-०२-२०२१) :** (१) व (२) दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी कोरेगाव भिमा येथे झालेल्या हिंसाचाराबाबत श्री.जयनारायण पटेल यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९/०२/२०१८ रोजीच्या आदेशानुसार चौकशी आयोग स्थापन करण्यात आलेला आहे. मार्च, २०२० पासून कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे टाळेबंदी लागू असल्यामुळे आयोगाचे कामकाज झाले नाही. त्यामुळे आयोगास उर्वरित कामकाज पूर्ण करण्यासाठी दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रंथालयांसाठी नवीन धोरण सादर करण्याबाबत

**(२४) ५४२० (१३-१२-२०२०). श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रंथालयांचे प्रश्न सोडवण्यासाठी नवीन धोरण सादर करणार असल्याचे मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान अधिवेशनात सांगितले असून सन २०१२-२०१३ च्या आर्थिक वर्षापासून नवीन ग्रंथालयांना मान्यता देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रंथालयांना अनुदान, दर्जावाढ तसेच नवीन ग्रंथालयांना मान्यता देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०९-०२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

मा.मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक ०७/०६/२०१४ निर्गमित करण्यात आला असून त्यानुसार “यापुढे नवीन ग्रंथालयांना मान्यता देण्यात येवू नये” असा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील ग्रंथालयांसाठी नवीन धोरण म्हणजेच महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ मध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ताडी-व्यावसायिकांचे कोरोना प्रादुर्भावामुळे आर्थिक नुकसान झाल्याबाबत

**(२५) ५४२९ (२३-११-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ताडी-व्यावसायिकांचे कोरोना प्रादुर्भावामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील ताडी-व्यावसायिकांच्या अडचणी तात्काळ सोडविण्याकरीता लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांच्याकडे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर जिल्ह्यातील ताडी-व्यावसायिकांच्या अडचणी तात्काळ सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२८-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर ताडी व्यावसायिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने, सन २०२०-२०२१ या ताडी वर्षाकरीता शासन निर्णय, दिनांक ३१/०८/२०२० अन्वये अनुज्ञप्ती शुल्कात मागील वर्षाच्या तुलनेत केलेली ६% वाढ मागे घेण्याचा व दिनांक १/०९/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१

या कालावधीसाठी, सन २०१९-२०२० या ताडी वर्षातील अनुज्ञप्ती शुल्काच्या प्रमाणात ३ महिन्याचे अनुज्ञप्ती शुल्क आकारण्याचा निर्णय गृह विभाग, शासन निर्णय, दिनांक २४/१२/२०२० अन्वये घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राष्ट्रीय निवृत्तिवेतनधारक शिक्षकांना शासनाचा हिश्श्याची रक्कम जमा करण्याबाबत

**(२६) ५५६० (१८-११-२०२०). श्री.बाळाराम पाटील : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक २८४० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत आलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांची अंशदायी पेन्शन योजनेची खाती उघडण्यात आली असून त्यांच्या खात्यावर त्यांच्या व शासनाच्या हिश्श्याची रक्कम जमा करुन त्यांना हिशोबाच्या उर्वरित पावत्या देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेमधील खातेधारकांची नावे राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेमध्ये (NPS) समाविष्ट करण्याची तसेच एनपीएसधारक शिक्षकांच्या खात्यामध्ये शासनाचा १४ टक्के हिश्श्याची रक्कम जमा करण्याबाबतची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०८-०२-२०२१) :** (१) सदर कर्मचाऱ्यांना जमा रकमेच्या पावत्या देण्याची कार्यवाही शिक्षण संचालनालयस्तरावरुन करण्यात येत आहे.

(२) याबाबतची कार्यवाही शिक्षण संचालनालयस्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

# मुंबईतील जम्बो कोविड सेंटरच्या उभारणीत आर्थिक अनियमितता झाल्याबाबत

**(२७) ५५७९ (२०-११-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जम्बो कोविड सेंटरच्या उभारणीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या पत्राव्दारे शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड सेंटरमधील फर्निचर व इतर साधनसामुग्री विकत घेण्याऐवजी दहापट अधिक दराने भाडे तत्वावर घेण्यात येणे, ऑक्सिजनयुक्त खाटांचे पुरवठा कंत्राट अनुभव नसलेल्या बिल्डरला बहाल करणे, यासारख्या गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मुलुंड जम्बो कोविड सेंटर - सदर कोविड सेंटर हे सिडको प्राधिकरणामार्फत उभारण्यात आले असून, त्यातील फर्निचर व इतर साधनसामुग्री त्यांचेमार्फत खरेदीने/भाड्याने घेण्यात आले आहे.

रिचर्डसन व क्रुडास जम्बो कोविड सेंटर - सदर कोविड सेंटरमध्ये फर्निचर भाडेतत्वावर घेण्यात आले नसून, ऑक्सिजनयुक्त खाटांचा पुरवठा करण्याचे कंत्राट कोणत्याही बिल्डरला देण्यात आलेले नाही.

एनएससीआय डोम, वरळी - सदर महासुविधा केंद्राकरीता आवश्यक असलेले फर्निचर व इतर साधनसामुग्री बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खाते तसेच व्यावसायिक-सामाजिक बांधिलकीमार्फत पुरविण्यात आले आहे. सदर केंद्रामध्ये कोणतेही फर्निचर वा इतर साधनसामुग्री भाडेतत्वावर घेण्यात आलेले नाही.

महालक्ष्मी रेसकोर्स - सदर ठिकाणी कोणतेही काम अनुभव नसलेल्या बिल्डरला देण्यात आले नसून, सदर काम हे निविदा मागवून लघुत्तम कंत्राटदाराची नियुक्ती करुन करण्यात आले आहे.

सदर काम हे माहे नोव्हेंबर, २०२० पासून खंडीत करण्यात आले आहे.

दहिसर (प.) येथील जम्बो कोविड सेंटर - सदर कोविड सेंटर एम.एम.आर.सी.एल. मार्फत उभारुन बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आले आहे.

गोरेगांव नेस्को - सदर ठिकाणी कोरोना सेंटर उभारणीमध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही. तसेच ऑक्सिजन सिलेंडर व त्याचे किट पुरवण्याचे काम महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खाते यांच्या दराने मे.रोमेल ग्रुप यांना देण्यात आले होते.

सदर कोविड सेंटरमधील फर्निचर व इतर साधनसामुग्री योग्य दराने भाडेतत्वावर घेण्यात आली होती. सदर साधनसामुग्री आता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्वाधीन करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उपस्थिती भत्ता योजनेचे रूपांतर "मुलींकरीता शौचालयाची देखभाल" या नवीन योजनेत करण्याबाबत

**(२८) ५५८४ (१२-११-२०२०). श्री.रामदास कदम, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक ३ जानेवारी, १९९२ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी उपस्थिती भत्ता योजना निर्णयानुसार अनुसूचित जाती-जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जमातीतील विद्यार्थिनींना २८ वर्षांपासून फक्त १ रुपये उपस्थिती भत्ता देऊन याकडे दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शालेय विद्यार्थ्यांसाठी केंद्र/राज्य पुरस्कृत मध्यान्ह भोजन योजना, मोफत पाठयपुस्तके योजना, मोफत गणवेश योजना, मानव विकास मिशनमार्फत मुलींना मोफत सायकल वाटप योजना, मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण योजनाही राबविण्यात येत असल्याने उपस्थिती भत्ता ही योजना कालबाह्य झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भत्ता वाढविण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय, एकूण किती वाढ करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे तसेच, उपस्थिती भत्ता योजनेचे रूपांतर मुलींकरीता शौचालयाची देखभाल या नवीन योजनेत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, तसेच ग्रामीण भागातील मुलींच्या शाळेतील उपस्थितीचे प्रमाण वाढवून त्यांना आर्थिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनविण्याकरीता शासनातर्फे इतर कोणत्या योजना राबविण्यात येणार आहेत काय ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१५-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.

इतर जास्त प्रभावी योजना आल्यामुळे उपस्थिती भत्ता देण्याची गरज राहिली नाही.

(३) उपस्थिती भत्ता योजनेऐवजी मुलींकरीता शौचालय बांधण्याची योजना आणणे प्रस्तावित आहे.
(४) उक्त प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. ग्रामीण भागातील मुलींच्या शाळेतील उपस्थितीचे प्रमाण वाढवून त्यांना आर्थिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनविण्याकरीता सद्य:स्थितीत पुढील योजना राबविण्यात येत आहेत :-

इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण योजना व विविध शिष्यवृत्त्या, मोफत गणवेश/पाठ्यपुस्तक वाटप योजना, शालेय पोषण आहार योजना, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, मुलींचे वसतिगृह, मानव विकास कार्यक्रमांतर्गत मुलींना मोफत सायकल वाटप योजना, स्वसंरक्षण, व्यवसाय प्रशिक्षण, करिअर मार्गदर्शन व समुपदेशन इ.

---

## राज्यातील शाळांना वर्गखोल्या बांधण्याबाबत

**(२९) ५५८६ (१३-१२-२०२०). श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३१७ शाळांना वर्गखोल्या नाहीत तर २५०७ शाळांचे वर्ग एकाच खोलीत भरत असल्याने संबंधित शाळांना वर्गखोल्या बांधून देण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वर्गखोल्या बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०५-०२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना शिक्षण हक्क कायद्यानुसार (RTE) आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा जसे वर्गखोली, मुला-मुलींकरीता स्वतंत्र स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी इत्यादी सुविधा भारत सरकारकडून समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत उपलब्ध असलेल्या निधीच्या मर्यादेत मंजूर करण्यात येतात. तसेच वर्गखोल्यांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषद सेस फंड, आमदार-खासदार निधी, चौदावा वित्त आयोग व सी.एस.आर. इत्यादी माध्यमांतून वर्गखोल्यांच्या बांधकाम/दुरुस्तीची तजवीज ठेवली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिध्दार्थ विधी महाविद्यालय, मुंबई येथील प्रभारी प्राचार्यांचे रिक्त पद भरण्याबाबत

**(३०) ५६०० (१२-११-२०२०). श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिध्दार्थ विधी महाविद्यालय, मुंबई येथील प्रभारी प्राचार्यांचे पद मागील दोन वर्षापासून भरण्यात आले नसून सदरच्या प्रभारी प्राचार्य नियुक्तीसाठी गत वर्षी मुंबई महाविद्यापीठाने तीन सदस्यांची समिती नेमून १५ दिवसात

समितीने अहवाल देणे अपेक्षित असतानाही एक वर्ष उलटूनही समितीने आपला अहवाल विद्यापीठास सादर केला नसल्याचे दिनांक २७ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राचार्यांची नियुक्ती न झाल्यामुळे व बँकेने महाविद्यालयाचे खाते थांबविले असल्यामुळे महाविद्यालयाच्या प्रशासकीय व आर्थिक कामकाजावर परिणाम होत असल्याच्या तक्रारी तेथील प्राध्यापक व कर्मचारी यांनी शासनाकडे अनेकदा केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राचार्यांची नियुक्ती होण्याबाबत सिनेट सदस्यांनी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना माहे जून, २०२० मध्ये निवदेन देऊन तशी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिध्दार्थ विधी महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी यांना न्याय देण्याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०९-०२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे सिध्दार्थ विधी महाविद्यालय हे मुंबई विद्यापीठाशी संलग्नित आहे. या महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे हित लक्षात घेवून केवळ महाविद्यालयाचे दैनंदिन कामकाज करण्याकरीता संबंधित महाविद्यालयातील शिक्षकास विद्यापीठामार्फत प्राधिकृत करण्यात येते. विद्यापीठाच्या दिनांक ०६/११/२०२० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेतील ठरावानुसार सिध्दार्थ विधी महाविद्यालयाच्या शिक्षकांची सेवाज्येष्ठता यादी तपासून सखोल अवलोकन करून सेवाज्येष्ठ शिक्षक ठरवून त्यास प्राधिकृत करण्याची कार्यवाही विद्यापीठामार्फत सुरू आहे. विद्यापीठाकडून मान्यता प्राप्त होताच सदर महाविद्यालयाचे वेतन अदा करणेविषयी तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या शुल्कात अपहार झाल्याबाबत

**(३१) ५६२६ (१८-११-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कापोटी विद्यापीठाला रुपये ४ कोटी ५४ लाख ५० हजार ४६० दिले असून विद्यापीठाने महाविद्यालयांना निधी उपलब्ध करुनही १०८ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून वसुल केलेले शुल्क संबंधित महाविद्यालयांना विद्यापीठाने उपलब्ध करुनही महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना शुल्क परत न केल्याने गैरप्रकार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार विद्यार्थ्यांचे शुल्क परत देण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०४-०२-२०२१) :** (१) व (२) शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ मध्ये दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काची रक्कम डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास देण्यात आली होती. सदर विद्यापीठाशी संलग्नित १०८ महाविद्यालयांतील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्काची रक्कम भरल्याने, अशा विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काची रक्कम परत करण्यासाठी विद्यापीठाकडून सदर महाविद्यालयांना रक्कम देण्यात आली होती. त्यापैकी ५६ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना वाटप न झालेली परीक्षा शुल्काची रक्कम रुपये ३९,७९,४०१/- विद्यापीठास परत केली असून, सदर रक्कम विद्यापीठाच्या लेखा विभागात जमा आहे. यामध्ये गैरप्रकार झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक पोस्ट मेट्रीक शिष्यवृत्तीचा लाभ सर्व पात्र विद्यार्थ्यांना मिळणेबाबत

**(३२) ५७२० (१८-११-२०२०). डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी असणाऱ्या एनएसपी पोर्टलमार्फत विविध शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत असून महाविद्यालय आणि विद्यापीठ यांनी नोंदणी करून त्यांची प्रक्रिया पूर्ण केली नसल्याने शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणार नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील एकही विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार नाही यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०८-०२-२०२१) :** (१) व (२) केंद्र शासनाकडून अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्तीसाठी एनएसपी पोर्टलमार्फत अर्ज करण्याची मुदत दिनांक ३१/१२/२०२० पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आकुर्डी येथील औद्योगिक क्षेत्र बेकायदेशीररित्या बिगरशेती करण्यास परवानगी देण्यात आल्याबाबत

**(३३) ५७२७ (१८-११-२०२०). श्री.सुरेश धस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) एमआयडीसी मधील आकुर्डी येथील २७ एकर औद्योगिक क्षेत्राकरीता शेती खरेदी विक्री प्रकरणी फसवणूकीचा गुन्हा मलबार हिल पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक प्रयोजनासाठी शेती, बिगर शेती करुन विक्रीचा प्रयत्न झालेला असून सदर औद्योगिक क्षेत्र बिगर शेती प्रयोजनासाठी देता येत नसतानाही अर्थपूर्ण व्यवहार करुन बेकायदेशीरपणे शासनाकडून परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीर रित्या २७ एकर औद्योगिक क्षेत्र अर्थपूर्ण व्यवहार करुन बिगर शेती प्रयोजनासाठी बेकायदेशीरपणे परवानगी देणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (११-०२-२०२१) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन मलबार पोलीस ठाण्यात गु.र.क्र.१५०/२०२० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांनी पुढील तपासावर घेतल्यानंतर त्यास आगुवि गुन्हा नोंद क्र.२७/२०२० देण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये आरोपी रविराज ताकवणे यास अटक करण्यात आली आहे व सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: बीड जिल्ह्यातील मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेचे चुकीच्या पध्दतीने सर्व्हेक्षण केल्याबाबत

**(३४) ५७५७ (१४-१२-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कृषी विकासासाठी मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना लागू करण्यात आली असून या योजनेत काही तालुके वगळण्यात आले आहेत, तसेच या योजनेमध्ये कृषी विभागाकडून विलंब केला जात असल्याने या योजनेचा अर्ज भरताना संबंधित वेबसाईट क्रॅश होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषीपंप मंजूरी मिळाल्यानंतर सर्व्हेक्षण चुकीच्या पध्दतीने केले जात असल्याच्या तक्रारी तसेच कृषी विभागाकडून मर्जीतील लोकांनाच या योजनेचा लाभ दिला जात असल्याच्या तक्रारी बीड जिल्हा कृषी विभागाकडे आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चुकीच्या सर्व्हे व इतर गैरप्रकाराबाबत संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२५-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे. राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करता यावे याकरीता मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेंतर्गत ३ व ५ अश्वशक्ती सौर कृषीपंप आस्थापित करण्याकरीता राज्यातील सर्व तालुका व गावांचा समावेश करण्यात आलेला आहे. मात्र ७.५ अश्वशक्ती सौर कृषीपंप आस्थापित करण्याकरीता संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांचेकडून प्राप्त सूचना, अटी व शर्तीनुसार तसेच संचालक, भूजल सर्वक्षण आणि विकास यंत्रणा, बीड यांचेकडून प्राप्त गावांच्या यादीनुसार ज्या सुरक्षित वर्गवारीतील पाणलोट क्षेत्रातील उपशाची स्थिती ६०% पेक्षा कमी आहे अशा सुरक्षित पाणलोट क्षेत्रातील गावांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या गावांकरीताच अर्ज स्वीकारण्यात येत आहेत.

मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेंतर्गत अर्ज भरताना कृषी विभागाकडून विलंब वा वेबसाईट क्रॅश होण्याची तक्रार अद्याप प्राप्त झालेली नाही.
(२) हे खरे नाही. लाभार्थ्यांने पुरवठादाराची निवड केल्यानंतर सादर लाभार्थ्यांच्या सौर पंपांची मागणी केलेल्या जागेची संयुक्तिक पाहणी ही लाभार्थी, महावितरण प्रतिनिधी व पुरवठादार प्रतिनिधी यांच्याव्दारे करण्यात येते. शासनाव्दारे ठरविलेल्या निकषानुसार संयुक्तिक पहाणी अहवाल मंजूर / नामंजूर करण्यात येतो.

बीड जिल्ह्यातील एकूण १३२९६ अर्ज प्राप्त झालेले असून त्यापैकी ९१२४ पात्र अर्ज मंजूर करुन त्याप्रमाणे शेतकऱ्यांना मागणी पत्र देण्यात आले आहे व विहित अटी व शर्तींची पूर्तता न केल्याने २९८० अर्ज अपात्र ठरलेले आहेत. मागणीपत्र दिलेल्या ९१२४ शेतकऱ्यांपेकी ७४३९ लाभार्थ्यांनी

मागणीपत्राचा भरणा केलेला असून ७३६३ लाभार्थ्यांनी पुरवठादाराची निवड केलेली आहे. संयुक्त पाहणीअंती २०६ लाभार्थी अपात्र ठरले असून ७१५७ लाभार्थ्यांचे सौर कृषीपंप आस्थापित करण्यासाठी पात्र ठरले आहेत. आतापर्यंत एकूण ५२०६ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्याबाबत

**(३५) ५८२० (१४-१२-२०२०). श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बंजारा समाज विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गात समाविष्ट असून तेलंगणा व आंध्रप्रदेशमध्ये त्यांचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश आहे तर कर्नाटक राज्यात अनुसूचित जातीमध्ये समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्याबाबत वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०५-०२-२०२१) :** (१) होय, बंजारा समाजाचा महाराष्ट्रात विमुक्त जाती-अ मध्ये तर आंध्रप्रदेश व तेलंगानामध्ये अनुसूचित जमाती व कर्नाटकमध्ये अनुसूचित जातीमध्ये समावेश आहे.

(२), (३) व (४) राज्यात बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये समावेश करण्याबाबत मागणी प्राप्त होत आहे. बंजारा समाजाचा महाराष्ट्र राज्यासाठीच्या अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्याबाबत दिनांक १२ जून, १९७९ च्या पत्रान्वये केंद्र शासनास शिफारस करण्यात आली होती. तथापि एखाद्या जातीचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यासाठी केंद्र शासनाच्या दिनांक २६ फेब्रुवारी, १९८१ च्या पत्रान्वये निर्धारित केलेल्या निकषांचा बंजारा समाज पुर्तता करीत नसल्याने दिनांक ६ नोव्हेंबर, १९८१ च्या पत्रान्वये सदर शिफारस मागे घेण्यात आली. सदर वस्तुस्थिती विचारात घेता अनुसूचित जमातीत समावेश करण्याकरीता निर्धारित करण्यात आलेले निकष बंजारा समाज पूर्ण करत नसल्याने बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबाबत शिफारस करता येणार नाही.

---

## मुंबईत राष्ट्रीय शहरी आरोग्य मोहिमेंतर्गत (एन.यू.एच.एम.) प्राप्त झालेल्या निधी विनावापर असल्याबाबत

**(३६) ५९६५ (२०-११-२०२०). श्री.रामनिवास सिंह, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसाठी राष्ट्रीय शहरी आरोग्य मोहिमेंतर्गत (एन.यू.एच.एम.) प्राप्त झालेल्या निधीपैकी केवळ ५४% निधी वापरला गेला असून ४५% निधी विनावापर असल्याने बृहन्मुंबई महापालिकेला सुमारे १३ कोटी रुपये शासनाला परत द्यावे लागल्याचे लेखा परिक्षण अहवालामार्फत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सन २०१८-२०१९ मधील कामकाजाचा लेखा परिक्षण विभागाने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार शहरातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्याच्या उद्देशातून राष्ट्रीय शहरी आरोग्य मोहिम (एनएएचएम) प्रकल्प मुंबई महापालिकेमार्फत राबविण्यात येत असून सन २०१४ ते २०१८ या काळात शासनाने दिलेल्या निधीपैकी रूपये ५२ कोटींचा निधी विनावापर आहे तसेच सन २०१८-२०१९

मध्ये रुपये ५ कोटी महापालिकेला अदा करण्यात आले असून सद्या महापालिकेच्या तिजोरीत जमा असलेल्या रुपये ५७ कोटी मधील केवळ ५४% टक्के निधीच वापरला गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोबाईल मेडिकल युनिटचा प्रस्ताव, जनजागृतीचे कार्यक्रम तसेच झोपडपट्टी भागातील वैद्यकीय शिबिरे व असंसर्गजन्य आजाराच्या केवळ सहाच शिबिरांचे आयोजन इ. कामे मुबलक प्रमाणात निधी उपलब्ध असताना प्रलंबित राहण्याची तसेच सदर निधी अखर्चित असण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०२-२०२१) :** (१) राष्ट्रीय शहरी आरोग्य मोहिमेंतर्गत सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध एकूण रुपये ५७.९० कोटी इतक्या निधीपैकी अखर्चिक रुपये १३.५८ कोटी इतका निधी राज्य आरोग्य सोसायटीस परत करण्यात आला आहे.
(२) राष्ट्रीय शहरी आरोग्य मोहिमेंतर्गत उपलब्ध निधीपैकी सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात रुपये ३१.६२ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

सदर खर्चित निधीतून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांचे सक्षमीकरण करण्यात आले असून, त्याव्दारे नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा देण्यात आली आहे.

राज्य आरोग्य सोसायटीस परत करण्यात आलेला निधी प्रामुख्याने मनुष्यबळ, रुग्ण कल्याण समिती, महिला आरोग्य समिती, मोबाईल मेडिकल युनिट, प्रशिक्षण, एस.एन.सी.यु. या बाबींकरीता देण्यात आला होता.

तथापि, मनुष्यबळ उपलब्ध न झाल्यामुळे, पावसाळी कालावधीमध्ये प्रशिक्षण आयोजित न करता आल्यामुळे, तसेच आशा स्वयंसेविका नियुक्ती, महिला आरोग्य समितीच्या सदस्यांची निर्मिती व रुग्ण कल्याण समिती निर्मिती प्रक्रिया सुरु असल्याने सदर निधी अखर्चिक राहिला होता.

उर्वरित रुपये १२.६८ कोटी इतक्या निधीचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत समायोजन करण्यात आले आहे.

(३) दिनांक ०१/०८/२०१८ पासून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शहर विभागात १, पश्चिम उपनगरे विभागात ३ व पूर्व उपनगरे विभागात १ अशी एकूण ५ मोबाईल मेडिकल युनिट कार्यरत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर मोबाईल मेडिकल युनिटला स्थानिक नागरिकांना सेवा पुरविण्याचे ठिकाण नेमून देण्यात येते.

सन २०१८-२०१९ अखेरपर्यंत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानामार्फत ७१ शिबिरे आयोजित करण्यात आली असून, असंसर्गजन्य आजाराच्या नियंत्रणासाठी नियोजित १२० शिबिरांपैकी केवळ ६ शिबिरे घेण्यात आली आहेत.

तसेच, आशा स्वयंसेविकांची नियुक्ती प्रक्रिया व महिला आरोग्य समिती निर्मिती प्रक्रिया सुरु असल्याने त्या कालावधीत महिला आरोग्य समितीच्या प्रशिक्षणाकरीता खर्च करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उच्च शिक्षण क्षेत्रातील शैक्षणिक बदलाकरीता समिती गठित केल्याबाबत

**(३७) ५९८६ (१३-१२-२०२०). श्री.नरेंद्र दराडे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च शिक्षण क्षेत्रात झालेला अमुलाग्रह बदल, नवीन शैक्षणिक प्रवाह आदिंच्या पार्श्वभूमीवर शिक्षण अधिक सुसंगत, संशोधनात्मक, रोजगारक्षम असणे व ते समाजातील सर्व घटकांना सहजरित्या उपलब्ध होणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमांव्दारे उच्च शिक्षण देणाऱ्या विविध शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे आदिंमध्ये निकोप व पोषक वातावरण निर्माण करुन विद्यार्थी हाच उच्च शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून नियोजन करण्यासाठी शासनाने विद्यापीठ आयोगाचे माजी अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली १३ सदस्यांची समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने शासनाला किती कालावधीत अहवाल सादर करावयाचा आहे व या समितीसाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देणे व निधी उपलब्ध करणे यानुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे, तसेच, सदर समितीमध्ये अन्य १३ सदस्य कोण-कोण आहेत ?

**श्री.उदय सामंत (०८-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये सुधारणा करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समिती आपला अंतरिम अहवाल शासनास ३ महिन्यांत सादर करेल. समितीला आवश्यक ती सर्व प्रशासकीय मदत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे उपलब्ध करुन देईल. तसेच समितीसाठी बैठक भत्यासह येणारा संपूर्ण खर्च विद्यापीठ त्यांच्या निधीतून विद्यापीठाच्या नियमावलीप्रमाणे करेल.

सदर समितीचे अध्यक्ष डॉ.सुखदेव थोरात, माजी अध्यक्ष विद्यापीठ अनुदान आयोग हे असून, समितीतील अन्य १३ सदस्यांची नावे खालीलप्रमाणे :-

१) डॉ. डी.टी. शिर्के, कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
२) डॉ.उध्दव भोसले, कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
३) डॉ. राजन वेळुकर, माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
४) डॉ.विजय खोले, माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
५) डॉ. बी.टी. साबळे, माजी कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
६) डॉ. नरेशचंद्र, माजी प्र-कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
७) ॲड.हर्षद भडभडे, मा.उच्च न्यायालय, मुंबई.
८) श्रीमती परवीन सय्यद, विधी अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
९) डॉ. रचिता एस. राथो, सहयोगी प्राध्यापक, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई.

१०) श्रीमती शितल देवरुखकर शेठ, सिनेट सदस्य, मुंबई विद्यापीठ.
११) प्रा. प्रसाद दोडे, दत्ता मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय.
१२) संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई.
१३) संचालक, उच्च शिक्षण, पुणे.

---

## लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३८) ६०५४ (२०-११-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ मार्फत चार वर्षांपूर्वी उदगीर आणि जळकोट तालुक्यात करण्यात आलेल्या रस्त्यांच्या विविध अर्धवट कामांमध्ये जवळपास ५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची गंभीर तक्रार माहिती अधिकार कार्यकर्ते श्री.अनुरथ चांदमारे यांनी शासनाकडे केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने दिनांक ७ ऑक्टोबर, २०२० रोजी पत्र देऊन औरंगाबाद येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांना तसेच दक्षता व गुण नियंत्रण मंडळाच्या अधीक्षक अभियंत्यांना (औरंगाबाद) संबंधित कार्यालयाकडून चौकशी अहवाल घेऊन तात्काळ शासनास सादर करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी अहवाल दिलेल्या मुदतीत न मिळाल्यास वरिष्ठांवर कारवाई करण्याचा इशारा दिला असून सदर प्रकरण गत दीड वर्षांपेक्षाही अधिक काळापासून प्रलंबित ठेवल्याबद्दल शासनाच्या कार्यासन अधिकाऱ्यांनी जा.क्र.रस्तेनि/२०१८/प्र.क्र.१५१/रस्ते-३ (सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यालय मुंबई), दिनांक ७ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या पत्रातून खेदही व्यक्त करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०४-०२-२०२१) :** (१) अशा स्वरूपाची तक्रार सन २०१८ मध्ये प्राप्त झाली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अशा स्वरूपाच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्नाधीन तक्रारीबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा यांचेमार्फत चौकशी सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनुसूचित जमातीमधील जात प्रमाणपत्र तपासणीमध्ये सुधारणा करण्याबाबत

**(३९) ६०७५ (१४-१२-२०२०). श्री.प्रवीण दटके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जमातीमधील काही जातींच्या गटांवर जात प्रमाणपत्र तपासणाच्या पध्दतीमुळे होणाऱ्या अन्यायाबाबत ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन (आफ्रोह) महाराष्ट्र या संघटनेने मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे जून, २०२० मध्ये वा त्यासुमारास स्वयंस्पष्ट निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनामध्ये केलेल्या ३६ प्रमुख मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जात प्रमाणपत्र तपासणाच्या पध्दतीमध्ये सुधारणा करुन होणारा अन्याय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०५-०२-२०२१) :** (१), (२), (३) व (४) ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन (आफ्रोह) या संघटनेने अनुसूचित जमातीमधील काही जातींच्या गटावर जात प्रमाणपत्र तपासण्याच्या पध्दतीमुळे अन्याय होत असल्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांना जून, २०२० मध्ये निवेदन सादर केले होते. सदर निवेदनामध्ये एकूण १८ मागण्या करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने जात प्रमाणपत्र तपासणीसाठी देण्याची सक्ती करु नये, जात प्रमाणपत्र तपासणी पध्दत बंद करण्यात यावी, जात प्रमाणपत्र कायदा व नियम रद्द करण्यात यावेत, जात प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे न्यायालयात गेलेल्यांना यथोचित भरपाई द्यावी इ. मागण्या करण्यात आलेल्या आहेत. अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी येत असलेल्या अडचणींबाबत लोकप्रतिनिधी तसेच विविध संघटनांकडून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने यासंदर्भात अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी श्री.पी.व्ही.हरदास, सेवानिवृत्त न्यायमुर्ती यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल सादर केला असून सदर अहवालातील शिफारशींबाबत सामाजिक न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात येत आहेत.

---

## शेळगाव (ता.देगलूर, जि.नांदेड) येथे गोठ्याला लागलेल्या आगीबाबत

**(४०) ६०८० (१४-१२-२०२०). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेळगाव (ता.देगलूर, जि.नांदेड) येथे एका कुटुंबाच्या गोठ्याला आग लागून ६ जनावरे, शेती, धान्य व संसारोपयोगी साहित्य जळून २५ लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक ३० ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बाधित कुटुंबाला कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०५-०२-२०२१) :** (१) होय.
(२) दिनांक २७/१०/२०२० रोजी श्री.साईनाथ उप्पलवार, रा.शेळगाव (ता.देगलूर, जि.नांदेड) यांच्या गोठ्याला आग लागून ६ जनावरे (३ म्हशी व ३ वजारी) मृत झाली. सदर घटनेचा पंचनामाकरून गोठ्याच्या नुकसानीसाठीची मदत राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) च्या निकषानुसार व दराने रुपये २१००/- इतकी रक्कम वाटप करण्यात येत आहे. मृत जनावरांच्या नुकसानीबाबतची मदत रुपये ९०,०००/- अनुज्ञेय असून ती देण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात शेतकऱ्यांना महात्मा ज्योतिबा फुले कर्ज माफी योजनेचा संपूर्ण लाभ मिळाला नसल्याबाबत

**(४१) ६०९२ (२३-११-२०२०). श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रसाद लाड, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खरीप व बागायत क्षेत्रासाठी (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यासाठी बहुतांश राष्ट्रीय कृषी व सहकारी बँकाकडून अडवणूक केली जात आहे. सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांना महात्मा ज्योतिबा फुले कर्ज माफी योजनेचा संपूर्ण लाभ मिळाला नसल्याने या बँकावर कार्यवाही करण्याची मागणी शेतकरी संघटनेच्यावतीने मंगळवेढा तहसिलदार यांच्याकडे निवेदनाव्दारे केली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील २-४ वर्षात शेतकरी महात्मा ज्योतिबा फुले कर्ज माफी योजना व शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या माध्यमातून बरेच शेतकरी कर्ज मुक्त झाले परंतु या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज वितरित करण्यासाठी बँकांकडे ऑनलाईन अर्ज करुन देखील ही कर्ज वितरित करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी अडवणूक करु नये असे शासनाचे आदेश असतानाही काही शेतकऱ्यांचे कर्ज बँक ऑफ महाराष्ट्र, ब्रम्हपुरी शाखेमध्ये थकित असल्याने त्यांना पीक कर्ज दिले जात नसल्याने, अशा बँकावर शासनाने कार्यवाही न केल्यास शेतकरी आंदोलन करणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जुन्या थकीत सन २०१९ पुर्वीच्या सर्व शेतकयांना कर्ज माफीचा लाभ देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२२-०१-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.
सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील मौजे अरळी, नंदूर, माचणुर सह कर्जासाठी दत्तक घेतलेल्या गावातील शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यासाठी आयसीआयसीआय बँक टाळाटाळ करत असून सदर बँकेवर कार्यवाही करणेबाबत निवेदन व तक्रारी तहसिलदार कार्यालय, मंगळवेढा जि.सोलापूर यांना प्राप्त झाले आहे.
(२) नाही.
(३) नाही.
अशा प्रकारची कोणतीही तक्रार/निवेदन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मंगळवेढा यांना प्राप्त नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जल जीवन मिशन योजनेत लोक सहभागाच्या अटीबाबत

**(४२) ६१७४ (१३-१२-२०२०). श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र व राज्य ५०:५०% हिश्श्याने जल जीवन मिशन योजना राबविण्यासाठी गाव पातळीवर १०% लोकवर्गणीची अट नमूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वीच्या भारत निर्माण व जलस्वराज्य योजनामध्ये १०% लोक सहभागासाठी प्रतिसाद मिळाला नसल्याने पूर्वीच्या योजनांची बरीचशी कामे अपूर्ण व गुणवत्ताहिन आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन १०% लोकसहभागाची अट रद्द करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२८-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जल जीवन मिशनमध्ये १०% लोक वर्गणीची अट नमुद करण्यात आली आहे.

(२) भारत निर्माण मधील काही कामे अपूर्ण होती हे खरे आहे.

(३) व (४) केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे शासनाने दिनांक ०४/०९/२०२० रोजी याबाबत निर्णय घेतला आहे.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यात गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक झाल्याबाबत

**(४३) ६१८२ (२०-११-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक झाल्याप्रकरणी शुभांगी पंढरीनाथ बोडखे व इतर यांनी पोलीस निरीक्षक अर्नाळा सागरी पोलीस ठाणे (ता.वसई, जि.पालघर) यांचेकडे दिनांक १६ नोव्हेंबर, २०१९ रोजी तक्रार दाखल करुनही अद्यापपर्यंत संबंधितांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात फसवणूक करणारे रंजीत खाडे व दिप्ती पोटे यांचा फोन नंबर सुरु असूनही पोलिसांनी याबाबत कोणतीच चौकशी केली नसून आर्थिक फसवणूक करणाऱ्यांना पोलीस प्रशासन पाठीशी घालून त्यांना सहकार्य करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आर्थिक फसवणूक करणाऱ्या दोषींवर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या पोलीस प्रशासनातील अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन फसवणूकदारांची भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (११-०२-२०२१) :** (१) व (२) नाही.

श्रीमती शुभांगी बोडके व इतर ६ यांनी गैरअर्जदार श्री.रणजित रमेश खाडे व सौ.दिप्ती रामेश्वर पांडे यांनी आर्थिक फसवणूक केल्याबाबत दिनांक १६/१०/२०२० रोजी अर्नाळा पोलीस ठाणे येथे देण्यात आला होता. परंतु यातील अर्जदारांचे साथीदारांपैकी श्री.कुणाल सुभाष कपाटे यांनी सममजकूराच्या अर्जातील प्रकाराबाबत माणिकपूर पोलीस ठाण्यात गु.र.क्र. २२८/२०२० नुसार दिनांक १६/०६/२०२० रोजी दाखल करण्यात आला. अर्जदार हा सदर गुन्ह्यातील साक्षीदार असल्याने त्यांचा अर्ज गुन्ह्याच्या तपासाकामी माणिकपूर पोलीस ठाणे येथे वर्ग करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे. नमुद गुन्ह्यातील आरोपींच्या पत्त्यावर तपासी अंमलदार गेले असता आरोपी सदर पत्त्यावर राहत नाहीत. आरोपींचे मोबाईल नंबर प्राप्त केले असून तपास करुन आरोपींना अटक करण्याबाबत कारवाई करण्यात येईल.
(३) सदर गुन्ह्यातील फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीच्या अनुषंगाने गुन्हा दाखल असून पोलीस तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

## मुंबईतील अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत

**(४४) ६१९७ (२०-११-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनुदानित प्राथमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सन २००९ पासून महानगरपालिकेकडून देण्यात येणारे सानुग्रह अनुदान महानगरपालिका शिक्षक कर्मचाऱ्यांपेक्षा ५० टक्के कमी देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महापालिकेकडून महानगरपालिका शिक्षक/कर्मचारी व अनुदानित शाळेतील ४५०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यामध्ये भेदभाव करण्यात येत असल्याची भावना मुंबई शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघाने व्यक्त केली असून महानगरपालिका शाळेतील शिक्षकांप्रमाणे अनुदानित शाळेतील कर्मचाऱ्यांनाही सानुग्रह अनुदान देण्यात यावे अशी मागणी शिक्षक कर्मचारी संघाने सन २०१० पासून आजमितीस सातत्याने करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्यवाहक व माझी शिक्षण समिती सदस्य श्री.शिवनाथ दराडे तसेच उपाध्यक्ष श्री.आनंद पवार हे अनुदानित प्राथमिक शाळेतील कर्मचाऱ्यांना संपूर्ण सानुग्रह अनुदान मिळण्याकरीता सातत्याने महानगरपालिका आयुक्त व शिक्षणाधिकारी आदींकडे पाठपुरावा करुन बैठक घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आजमितीस अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १००% सानुग्रह अनुदान न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०२-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी प्राथमिक शाळांसाठी स्वतंत्र अनुदान सहाय्य संहिता लागू असून, खाजगी व्यवस्थापनाव्दारे चालविण्यात येणाऱ्या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर संबंधित शाळा व्यवस्थापनाचे असल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांचे दायित्व शाळा व्यवस्थापनाचे आहे.

खाजगी प्राथमिक अनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांकरीता राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या ५०% अनुदान प्रतिपूर्तीसाठी ग्राह्य असणाऱ्या सूचीमध्ये सानुग्रह अनुदानाचा समावेश नाही.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर कर्मचाऱ्यांना ५०% सानुग्रह अनुदान देण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिवडी, मुंबई येथील टी.बी.रूग्णालयामधून बेपत्ता असणाऱ्या कोरोना रूग्णांचा मृतदेह शौचालयात सापडल्याबाबत

**(४५) ६२५७ (२०-११-२०२०). डॉ.रणजित पाटील, श्री.प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवडी, मुंबई येथील टी.बी. रूग्णालयामधून १४ दिवसांपासून बेपत्ता असणाऱ्या कोरोना रूग्णांचा मृतदेह रूग्णालयाच्या शौचालयात सापडल्याचे दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सदर मृतदेह पूर्णपणे खराब अवस्थेत असल्यामुळे रूग्णांची ओळख पटणेही कठीण झाल्यामुळे सदर मृतदेह हा स्त्रीचा आहे की पुरूषाचा याची माहिती मिळवण्यासाठी रेकॉर्ड तपासण्यात आले असता २७ वर्षीय श्री.सूर्यभान यादव नावाचा रूग्ण दिनांक ४ ऑक्टोबर, २०२० पासून वॉर्डमधून बेपत्ता असल्याचे लक्षात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रुग्ण बेपत्ता झाल्याची तक्रारही नोंदवण्यात आली होती परंतु अधीक्षक डॉक्टर ललित कुमार यांनी टी.बी. “रूग्णांनी रूग्णालयातून पळून जाणे नवीन नाही” असे इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शौचालयाचा इतर रूग्णांकडून वापर होत असताना तसेच ते रोज स्वच्छ करणे अपेक्षित असताना १४ दिवसांपासून पडून असलेल्या मृतदेहाबद्दल कोणालाही माहिती नसणे हे फारच आश्चर्यजनक असल्याचे मत जनतेमार्फत व्यक्त केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०२-२०२१) :** (१) दिनांक १८ ऑक्टोबर, २०२० रोजी सकाळच्या सुमारास शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयाच्या शौचालयात कुजलेला मृतदेह आढळून आला.

तसेच, दिनांक ०४/१०/२०२० रोजी सूर्यभान यादव नावाचा २७ वर्षीय रुग्ण सदर रुग्णालयातून बेपत्ता झाल्याची तक्रार स्थानिक पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली होती हे खरे आहे.
(२) टी.बी. रुग्ण पळून जाणे नवीन नाही असे डॉ.ललितकुमार आनंदे यांनी इंडियन एक्सप्रेसला सांगितले नसल्याबाबत नमूद केल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) सदर रुग्णालयातील कोविड-१९ कक्ष, वॉर्ड क्र. १२ मध्ये एकूण ३ शौचालये व ३ स्नानगृहे आहेत. सदर ३ शौचालयांपैकी २ शौचालयांचा वापर रुग्णांकडून दररोज होत होता व मृतदेह पडून असलेले शौचालय मृतदेहामुळे आतून बंद झाला असल्याचे चौकशीअंती समजले.

कोविड-१९ कक्ष असल्यामुळे सफाई कामगारांची पाळी दररोज बदलत होती. नवीन सफाई कामगारांना सदर शौचालयामध्ये रुग्ण आत असल्याचे वाटत होते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीच्या शिफारशीनुसार खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :-

- तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक (प्र) यांना कार्यमुक्त करुन त्यांच्या जागेवर कार्यक्षम अधिकाऱ्याची वैद्यकीय अधीक्षक (प्र) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- १९ कामगार/कर्मचाऱ्यांविरुध्द खात्यांतर्गत चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.
- ६ कर्मचाऱ्यांना अभिलेखित ताकीद ज्ञापन देण्यात येणार आहे.
- १७ बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांना ज्ञापन देऊन त्यांच्या कंत्राट नुतनीकरणाबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात दुष्काळासंदर्भात असलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(४६) २८०९२ (१३-०४-२०१७). श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २४५८९ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रासह सोलापूर जिल्हयात सन २०१५ मध्ये दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दुष्काळाबाबत केंद्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ तसेच दुष्काळ व्यवस्थापन मार्गदर्शक तत्वे, अन्न सुरक्षा कायदा व केंद्राच्या अनेक योजना या प्रत्यक्षात कागदावरच राहिल्या आहेत असा दावा मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या एका याचिकेत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यातील दुष्काळासंदर्भात असलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०५-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मा.मंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या रिट याचिका क्र.२३१५/२०१७, डॉ.संजय लाखे पाटील विरुध्द महाराष्ट्र शासन या रिट याचिकेत विविध योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनास आदेश देण्याची विनंती याचिकाकर्त्याने मा.उच्च न्यायालयास केली आहे.

(३) खरीप हंगाम सन २०१७, २०१८, २०१९ व २०२० मध्ये व रब्बी हंगाम २०१७ मध्ये दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ मध्ये विहित केलेल्या निकषानुसार राज्यातील तालुक्यामध्ये दुष्काळ जाहीर करून, दुष्काळग्रस्त तालुक्यामध्ये खालीलप्रमाणे उपाययोजना लागू करण्यात आल्या.

१) जमीन महसूलात सूट.
२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन.
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती.
४) कृषी पंपाच्या चालू वीज बिलात ३३.५% सूट.
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता.
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर.
८) दुष्काळ जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्याच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

त्याचप्रमाणे जनावरांना चारा व पाणी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने शासनामार्फत दुष्काळ जाहीर केलेल्या भागात जनावरांच्या चारा छावण्या सुरू कार्यवाही करण्यात येते. दुष्काळग्रस्त भागातील मुलांना पोषण तत्वयुक्त आहार देण्याच्या अनुषंगाने, एकात्मिक बालविकास सेवा योजनांतर्गत संपूर्ण राज्यात ६ महिने ते ३ वर्षाची मुले, गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता यांना घरपोच आहार दिला जातो. तर ३ ते ६ वर्ष वयोगटास गरम ताजा आहार दिला जातो. राज्यात मनरेगा संदर्भात राज्य रोजगार हमी मंडळ दिनांक १३ ऑक्टोबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आले आहे. सदर मंडळामार्फत मनरेगा योजनेची अंमलबजावणी राज्यात सुरू करण्यात आली आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## मुंबईतील जे.जे.रुग्णालयातील महिला प्राध्यापकाकडून निवासी डॉक्टरांचा छळ होत असल्याबाबत

**(४७) ४६७७२ (०५-०७-२०१९). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. रुग्णालयातील महिला प्राध्यापक डॉ.राजश्री कटके यांच्यावर निवासी डॉक्टरांचा छळ केल्याचा आरोप असल्याचे दिनांक १/०३/२०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त महिला प्राध्यापकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०८-०२-२०२१) :** (१) होय, यासंदर्भात तक्रार अर्ज प्राप्त झाले आहेत.

(२) व (३) डॉ.राजश्री कटके, प्राध्यापक, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र यांच्याविरूध्द प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने त्यांची शासन आदेश दिनांक ०६/०५/२०१९ अन्वये ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई येथून स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबेजोगाई येथे बदली करण्यात आली होती. त्याचप्रमाणे सदर तक्रारींची सखोल चौकशी करण्यासाठी शासन आदेश दिनांक २०/०७/२०१९ अन्वये डॉ.पल्लवी सापळे, तत्कालीन अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे.

प्रसंगत: महिला बालकांचे हक्क कल्याण समितीसमोर झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान बदली रद्द करण्याबाबत दिलेले आश्वासन तसेच मुंबई येथे पद रिक्त असल्याने शासन आदेश दिनांक २५/०९/२०२० अन्वये त्यांची पुन्हा ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई येथे बदली करण्यात आली आहे.

___

## वाकोला, सांताक्रुझ पूर्व येथील जोड रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येवूनही मार्गावरील राडारोडा (डेब्रीज) उचलण्याबाबत

**(४८) ४८३१४ (१२-०७-२०१९). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील यशवंतनगर, वाकोला, सांताक्रुझ पूर्व येथील आदित्य अपार्टमेंट व अरीहंत अपार्टमेंट येथून सुरु होणारा व आर.आर. कांबळे मार्गाला जोडणाऱ्या जोड रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येवूनही मार्गावरील राडारोडा (डेब्रीज) उचलण्यात आलेला नसल्यामुळे नागरिकांना जाण्या येण्यास त्रास होत असून पावसाळयात येथे पाणी साचुन रोगराई पसरुन नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार असल्याने तेथील नागरिकांनी संबंधितांना निवेदनाव्दारे कळविल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर राडारोडा (डेब्रीज) त्वरीत उचलण्याबाबत तसेच रस्ता पूर्ववत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०२-२०२१) :** (१) व (२) सांताक्रुझ वाकोला यशवंत नगर येथील आदित्य अपार्टमेंट व अरिहंत अपार्टमेंट येथून सुरु होणारा व आर.आर. कांबळे मार्गाला जोडणाऱ्या जोड रस्त्यावर मलनि:सारण वाहिनी टाकण्याचे काम माहे मे, २०१९ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पूर्ण करण्यात आले असून, तद्नंतर सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत सदर रस्त्यावर कोणतेही डेब्रीज नसून, सदर रस्ता वाहतूक व पादचाऱ्यांसाठी खुला करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

___

## मुंबई महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि टॅब ठेवण्यासाठी लॉकर देण्याबाबत

**(४९) ४८४९८ (१२-०७-२०१९). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि टॅब ठेवण्यासाठी लॉकर देण्यास शासनाने नकार दिल्याचे दिनांक २५ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी होणार नसून अनेक विद्यार्थ्यांना पाठ दुखीच्या व्याधींना सामोरे जावे लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेवून मुंबईतील महानगरपालिका शाळेत विद्यार्थ्यांना टॅब व शैक्षणिक साहित्य ठेवण्यासाठी लॉकर उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०२-२०२१) :** (१), (२) व (३) शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीवर दप्तराचे ओझे वाहणाऱ्या मुलांमध्ये पाठदुखीचा त्रास, सांधे व स्नायू आखडणे, मणक्यांची झीज, मान दुखणे, थकवा येणे, मानसिक ताण येणे यासारखे आजार होऊ नये याकरीता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णयानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकास्तरावर परिपत्रक जारी करुन सर्व संबंधित अधिकारी व मुख्याध्यापक यांना सूचित करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने शाळेला दररोजच्या तासिकानिहाय आवश्यक ती वह्या पुस्तके आणण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून, त्यानुसार कार्यवाही केली जाते.

दप्तराचे ओझे कमी व्हावे याउद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये आठवी व नववी विद्यार्थ्यांना सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७ व सन २०१८-२०१९ या तीन वर्षांत एकूण ६१,९२१ टॅब देण्यात आले आहेत.

टॅब व शैक्षणिक साहित्य ठेवण्यासाठी मनपा शाळांमध्ये लॉकर्सऐवजी कपाटे वाटप करण्यात आली आहेत. सदर कपाटामध्ये मोठे चार खण असल्यामुळे जास्त प्रमाणात टॅब राहतील या हेतूने ९९० कपाटांचे वाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नायर रुग्णालयातील सात व्हेंटीलेटर बंद असल्याबाबत

**(५०) ४९३३३ (२३-०८-२०१९). श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायर रुग्णालयाच्या एमआयसीयु विभागातील पाच व्हेंटीलेटर गत सहा महिन्यांपासून आयपीसीयू विभागातील एक व्हेंटीलेटर गत एक महिन्यापासून आणि एनओटीआरआर विभागातील एक व्हेंटीलेटर माहे जानेवारी, २०१९ पासून बंद असल्यामुळे मुंबई शहर/उपनगरासह राज्यातील विविध जिल्हयातून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत असल्याची गंभीर बाब दिनांक ३ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार बंद व्हेंटीलेटर्सची दुरुस्ती करण्याबाबत तसेच नवीन व्हेंटीलेटर्स खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०२-२०२१)** : (१) व (२) नायर रुग्णालयातील एन.आय.सी.यु. विभागात ८ व आयपीसीयु विभागात ७ व्हेंटीलेटर्स असून, सदर सर्व व्हेंटीलेटर्स सुस्थितीत कार्यरत आहेत.

सदर रुग्णालयाच्या एम.आय.सी.यु. विभागात २३ खाटा असून, त्यापैकी १९ खाटांना व्हेंटीलेटर्स असून, ते सुस्थितीत कार्यरत आहेत.

तसेच, बधिरीकरण विभागांतर्गत येत असलेल्या एन.ओ.टी.आर.आर. विभागात एकूण ८ व्हेंटीलेटर्स असून, ते सुस्थितीत कार्यरत आहेत.

माहे मार्च, २०२० ते डिसेंबर, २०२० या कालावधीत कोविड रुग्णांकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खाते विभागाकडून तसेच देणगी दाखल एकूण ३७ पी.एम. केअर व्हेंटीलेटर्स व ५४ इतर व्हेंटीलेटर्स नायर रुग्णालयात उपलब्ध झाले असून ते सुस्थितीत कार्यरत आहेत. सदर व्हेंटीलेटर्स इतर आय.सी.यु/रिकव्हरी रुम/वॉर्डसमध्ये वापराकरीता दिली जातात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.